महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जा.क्र. :-म.आ./मा.व्य/०६
दिनांक:-०१/०४/२०२१

## -: आदेश :-

विषय :- अभियांत्रिकी महाविद्यालय मैदान, शिवाजीनगर येथील कोविड हॉस्पिटल चालविणेकरिता कार्यकारी समिती गठीत करणेबाबत.

संदर्भ :- मा. सुकाणू समिती, COEP जंबो कोविड हॉस्पिटल यांचे दि.०२/०३/२०२१ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

पुणे महानगरपालिकेमार्फत अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मैदान, शिवाजीनगर येथे तयार करण्यात आलेल्या डेडीकेटेड कोविड – १९ हॉस्पिटल (डी.सी.एच.) बाबत पुणे महानगरपालिका स्तरावर करण्यात आलेल्या दि. ०२/०३/२०२१ रोजीच्या मा. सुकाणू समितीच्या बैठकीमध्ये पुणे महानगरपालिका यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मैदान, शिवाजीनगर येथील कोविड हॉस्पिटल चालविणेकरिता कार्यकारी समिती गठीत करावी असा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुसार, मी विक्रम कुमार, महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका मला प्राप्त अधिकारान्वये अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मैदान, शिवाजीनगर येथील डेडीकेटेड कोविड – १९ हॉस्पिटल (डी.सी.एच.) बाबत पुणे महानगरपालिका स्तरावर अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे कार्यकारी समिती गठीत करित आहे.

| अधिकारी | पदनाम |
|---|---|
| उप आयुक्त मालमत्ता व व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका | सह अध्यक्ष |
| आरोग्य अधिकारी, पुणे महानगरपालिका | सदस्य |
| मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पुणे महानगरपालिका | सदस्य |
| मुख्य अग्निशामन अधिकारी, पुणे महानगरपालिका | सदस्य |
| मुख्य अभियंता, पाणी पुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका | सदस्य |
| मुख्य अभियंता, विद्युत विभाग, पुणे महानगरपालिका | सदस्य |
| डॉ. अंजली साबणे, सहाय्यक आरोग्य अधिकारी, पुणे महानगरपालिका | सदस्य सचिव |

सदर कार्यकारी समितीची सर्वसाधारण कर्तव्य आणि कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे.

१. कोविड हॉस्पिटल सुरु झाल्यानंतर कार्यान्वयन प्रक्रियेचे सर्वसाधारण संचलन करणे.
२. पुणे महानगरपालिकेमार्फत होणाऱ्या विविध ऑपरेशन्सवर नियंत्रण ठेवणे. पुणे महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या प्राथमिक सुविधा (पाणी पुरवठा, मलनि:स्सारण, घनकचरा व्यवस्थापन, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन ) तसेच विद्युत पुरवठा याचे सर्वसाधारण नियंत्रण ठेवणे.

३. इन्फ्रास्ट्रक्चर फॅसिलीटी एजन्सी आणि मेडिकल ऑपरेटर पुरवठादार यांचे कामावर देखरेख ठेवणे.

४. रुग्णांवरील उपचार पद्धती शासनाच्या किंवा तत्सम संबंधित संस्थांच्या मार्गदर्शक तत्वानुसार होत असल्याची खातरजमा करणे.

५. विविध प्रकारच्या मेडिकल आणि नॉन मेडिकल इनव्हेंटरीचे व्यवस्थापन करणे.

६. रुग्ण व मेडिकल/नॉन मेडिकल स्टाफच्या लॉजिंग आणि बोर्डिंग व्यवस्थेचे सनियंत्रण करणे.

७. कोविड हॉस्पिटल मधील आय.टी. सिस्टीम, डाटा मॅनेजमेंट, डाटा शेअरिंग व रिपोर्टींग यांचे सनियंत्रण.

८. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०२, महापालिका सहाय्यक आयुक्त (शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय) व परिमंडळ आरोग्य अधिकारी हे क्षेत्रीय स्तरावर आवश्यक त्या सोयी सुविधा, त्यांचे नियोजन तसेच वैद्यकीय बाबींशी निगडीत प्रश्नांसंदर्भात आवश्यकतेनुसार करावयाच्या उपाययोजनांची अंमलबजावणी व नियंत्रण ठेवतील.

९. उप अभियंता, विद्युत विभाग, उप अभियंता, पाणी पुरवठा विभाग व उप अभियंता, मलनि:स्सारण व देखभाल विभाग यांनी अभियांत्रिकी महाविद्यालय येथील कोविड हॉस्पिटलमधील त्यांचे विभागाशी संबंधित प्रश्न तातडीने सोडविणे, त्या संदर्भात अभियांत्रिकी हॉस्पिटलमध्ये कार्यरत एजन्सी तसेच पुणे महानगरपालिका यांचेशी समन्वय साधणे.

१०. उप आयुक्त, परिमंडळ क्र. ०२ व महापालिका सहाय्यक आयुक्त, शिवाजीनगर-घोलेरोड क्षेत्रीय कार्यालय यांनी कोविड हॉस्पिटल व पुणे मनपामधील क्षेत्रीय स्तरांवरील समस्यांबाबत समन्वय साधणे.

११. कोविड हॉस्पिटल संदर्भातील पुणे महानगरपालिकेशी निगडीत प्रश्न सोडविणे व त्याबाबत आवश्यक ती उपाययोजना करणे.

(विक्रम कुमार)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका